**- अनुक्रमणिका -**


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | २ |
| २ | पर्यावरण व सामाजिक मूल्यांकनाबाबत संयुक्त अहवाल | ३ |
| ३ | अभ्यासाची कार्यपद्धती आणि दृष्टिकोन | ३ |
| ४ | धोरणे व अनुषांगिक अधिनियम व संस्था | ३ |
| ५ | कृषि पणन विषयक धोरणे | ५ |
| ६ | जागतिक बँकेची सुरक्षाविषयक धोरणे | ५ |
| ७ | निष्कर्ष व अभिप्राय - सारांश | ६ |
| ८ | लाभार्थीशी सल्लामसलत | ८ |
| ९ | पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती (Environmental & Social Management Framework - ESMF) | ८ |
| १० | विस्थापना व पुनर्वसन संदर्भात जमीन मालकीहक्क संबंधाने कार्यपद्धती | ९ |
| ११ | स्त्री-पुरूष समानता विकास व अनुषांगिक उपाययोजना | १० |
| १२ | आदिवासी विकास उपाययोजना | ११ |
| १३ | संस्थात्मक व्यवस्था - पर्यावरण व सामाजिक विषयक कक्ष (Environment & Social Cell – ESC) | १२ |
| १४ | विवाद समाशोधन यंत्रणा (Conflict Resolution Mechanism) | १३ |
| १५ | सनियंत्रण व मूल्यमापन | १५ |


-०-०-०-

*महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्प*

*पर्यावरण व सामाजिक मूल्यांकनाबाबत संयुक्त अहवाल (सारांश)*

## प्रास्ताविक

अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांकडील अत्यंत कमी प्रमाणात असणारे विक्रीयोग्य शेती उत्पादन आणि या शेतकऱ्यांची शेतमालाचा भाव ठरविण्याची मर्यादित क्षमता यामुळे त्यांच्या शेतमालास रास्त किंमत मिळत नाही, असे निदर्शनास आलेले आहे. तसेच, बाजार समितीच्या कार्यक्षेत्राबाहेर शेतमाल विक्रीवर असलेली बंधने या मुळेसुद्धा या शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेशी येणारा संपर्क मर्यादित होतो आहे. दुर्लक्षित असलेले ग्रामीण बाजार, पुरेशा प्रमाणामध्ये नियमित बाजारक्षेत्र उपलब्ध नसणे, दुर्गम भागात असलेले शेतमाल उत्पादन क्षेत्र व त्याची बाजारपेठेपासून अंतराची समस्या आणि बाजारपेठेमधील अपुऱ्या सोयी सुविधा या कारणाने या शेतकऱ्यांच्या विक्रय-क्षमतेवर मर्यादा आलेल्या आहेत. याच प्रमाणे, शेतमाल बाजार पेठेतील मध्यस्थांची मोठी साखळी व त्यांची एकाधिकारशाही असणे, बाजारक्षेत्रामध्ये अत्यावश्यक असणाऱ्या सोयींचा अभाव असणे (उदाहरणार्थ - विक्रीस आणण्यात येणाऱ्या शेतमालाची स्वच्छता करणे; मालाचा दर्जा ठरविणे; पॅकबंद करणे; त्याचे प्रमाणिकरण करणे या सोयींचा अभाव असणे), स्थानिक व जागतिक शेतमाल बाजारपेठेची अपुरी माहिती असणे, पुरवठा साखळी खंडित स्वरूपाची असणे, शीतगृहांची अपुरी सुविधा आणि शेतमाल सुगी पश्चात टप्प्यावरील मोठ्या प्रमाणातील होत असलेली तूट या सर्व महत्वाच्या बाबी सुद्धा शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी रास्त भाव मिळण्यास अडचणीच्या ठरत आहेत.

आजमितीस महाराष्ट्र राज्यामध्ये कृषि उत्पन्न बाजार समित्यांची २९४ मुख्य बाजार आवारे व ६१२ उप बाजार आवारे कार्यरत आहेत. तथापि, या बाजार आवारांमध्ये आत्यावश्यक मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, एकूण बाजार आवारांपैकी केवळ दोन-तृतियांश नियमित बाजार आवारांमध्येच लिलावासाठी शेड अस्तित्वात आहेत, केवळ ६० टक्के बाजार आवारांमध्ये विक्रेता संकुल आहे, एक-तृतियांश पेक्षा कमी नियमित बाजार आवारांमध्ये शेतमालाचा दर्जा ठरविणेच्या सुविधा आहेत, फक्त ५० टक्के बाजार आवारांमध्येच शेतकरी निवास सुविधा आहेत आणि केवळ १० टक्केपेक्षा कमी बाजार आवारांत शीतगृह सुविधा अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ या नोडल एजन्सीच्या माध्यमातून महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात अर्थसहाय्य मिळण्यासाठी जागतिक बँकेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

शेतमाल बाजारपेठेशी संबंधित स्पर्धात्मक विपणन प्रणाली प्रस्थापित करणे व अद्ययावत बाजारपेठ सुविधा शेतकऱ्यांना परिणामकारकरित्या उपलब्ध करून देणे, या अनुषंगाने शेतमाल उत्पादन करणारे शेतकरी व पशुधन उत्पादक शेतकरी यांना संबंधित बाजारपेठेसंदर्भात अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे आणि त्यासाठी अधिक परिणामकारक अशा उत्पादकांच्या संस्था स्थापन करणे असे उपरोक्त प्रस्तावित महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्पाचे प्रमुख विकासात्मक उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचे दोन मुख्य घटक आहेत.

१) बाजारपेठेमधील सोयीसुविधांची सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांना जास्तीतजास्त विपणन संधी उपलब्ध करून देणे.

२) सघन शेतमाल क्षमता प्रस्थापित करने आणि उत्पादन क्षमतेचा विस्तार करणे.

## पर्यावरण व सामाजिक मूल्यांकनाबाबत संयुक्त अहवाल

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ या नोडल एजन्सीने पर्यावरण व सामाजिक मूल्यांकनाबाबत संयुक्त अभ्यास हाती घेतला होता. प्रस्तावित कार्यक्रमाच्या अंमलबजावणीशी संबंधित असणारे महत्वाच्या पर्यावरण विषयक व सामाजिक मुद्द्यांची निवड-निश्चिती करणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश होता. सदर प्रकल्पामधून होणारे पर्यावरण विषयक व सामाजिक फायदे अधोरेखित करणे तसेच त्यासंबंधित उद्भवू शकणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबत उपाय-योजना निश्चित करणे या बाबी उपरोक्त अभ्यासामधून अपेक्षित होत्या. या अभ्यासाचा परिपाक म्हणून, प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर पर्यावरणविषयक व सामाजिक मुद्द्यांबाबत एकत्रितरित्या विचार करण्यात येऊन, **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF) निश्चित करण्यात आलेली आहे.

## अभ्यासाची कार्यपद्धती आणि दृष्टिकोन

या अभ्यासामध्ये प्राथमिक व दुय्यम माहिती (डाटा) संकलन याचा समावेश करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय पातळीवरील आणि राज्य पातळीवरील संबंधित सामाजिक, पर्यावरण विषयक व विभागीय धोरणे आणि नियामक संरचना यांचा अभ्यास व मूल्यमापन यामध्ये करण्यात आला आहे. प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रथम वर्षामध्ये हाती घेण्यात यावयाच्या उप-घटकांशी संबंधित असलेल्या विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोंकण या विभागातील संस्था / स्थळे यांना क्षेत्र भेटी देऊन प्राथमिक माहिती संकलन करण्यात आले. या प्रकल्पाशी निगडित असणाऱ्या व सामाजिक, पर्यावरण विषयक बाबींवरील सध्या परिणाम करीत असलेल्या मुद्द्यांची तसेच परिणाम करू शकणाऱ्या मुद्द्यांची निवड-निश्चिती संभाव्य लाभधारकांबरोबरील गटचर्चा व मुलाखती यांच्या आधारे करण्यात आली. सदर अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्या सहकार्याने क्षेत्रीय भेटींसाठी स्थळांची निवड करणे, त्यांचे नियोजन करणे, लाभार्थींशी संपर्क साधणे आणि निष्कर्षांचे सादरीकरण या सर्व बाबी करण्यात आल्या.

## धोरणे व अनुषांगिक अधिनियम व संस्था

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरितां राज्याचे धोरण व नियमन पोषक आहे असे निदर्शनास येते. कृषि पणन संबंधित उपक्रमांना पूरक आणि भौगोलिक व सामाजिक पर्यावरणास सुरक्षित ठेवण्यास अनुकूल असे अनेक कायदे-कानू राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर अस्तित्वात आहेत. अभ्यास गटाने या पैकी खालील कायदे-कानू यांचा आढावा घेतला.

| कायदे / कानू / धोरणे |
|---|
| १. पर्यावरण विषयक कायदे व धोरणे |
| पर्यावरण सुरक्षा अधिनियम १९८६ (Environmental Protection Act (EPA) 1986) |
| जल (प्रदूषण नियंत्रण) अधिनियम (Water (Prevention of Pollution) Act) |



(कृपया संदर्भासाठी मूळ इंग्रजी अहवाल पहावा.)

| कायदे / कानू / धोरणे |
|---|
| वायू (प्रदूषण नियंत्रण) अधिनियम (Air (Prevention of Pollution) Act) |
| पर्यावरण बदल मूल्यमापन अभ्यास (Environmental Impact Assessment) |
| सागर किनारपट्टी व्यवस्थापन अधिसूचना २००८ (Coastal Zone Management (CZM) Notification 2008) |
| अतिधोकाप्रवण / जैव-वैद्यक टाकावू पदार्थांचे व्यवस्थापन, हाताळणी व निःस्सारण संबंधित नियम (Hazardous / Biomedical Waste Management, Handling & Disposal Rules) |
| २. इतर अनुषांगिक कायदे / कानू / धोरणे |
| बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८, बियाणे (नियंत्रण) आदेश १९८३ (The Seeds Act 1966, Seeds Rules 1968, Seeds (Control) Order 1983) |
| कीडनाशक अधिनियम १९६८, कीडनाशक नियम १९७१, कीड नाशक (नियंत्रण) आदेश १९८५ (Insecticide Act 1968, Insecticide Rules 1971, Insecticide (Control) Order 1985) |
| खते नियंत्रण आदेश १९८५, खते वाहतूक नियंत्रण आदेश १९७३, अत्यावश्यक वस्तू अधिनियम (सुधारित) १९८६ (Fertilizer Control Order 1985, Fertilizer Movement Control Order 1985, Essential Commodities Act (Amended) 1986) |
| ३. सामाजिक कायदे व धोरणे |
| प्रकल्पग्रस्तांचे विस्थापन व पुनर्वसन यासंबंधी राष्ट्रीय धोरण २००४ (National Policy on Resettlement & Rehabilitation (NPRR) of Project Affected Families 2004) |
| महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम २००१ (Maharashtra Project Affected Persons Rehabilitation Act 2001) |
| आदिवासी विकास संबंधी राष्ट्रीय धोरण १९९९ (National Policy on Tribal Development 1999) |
| अधिसूचित जमाती व इतर परंपरागत जंगल-वासी (जंगल-हक्क मान्यता-प्रदान) अधिनियम २००६ (The Scheduled Tribes & Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act 2006) |
| आदिवासी उप योजना (Sub plan for Scheduled (Tribal) Areas) |
| महिला धोरण - राष्ट्रीय महिला आयोग (Gender Policy – National Commission of Women) |
| महाराष्ट्र राज्य महिला धोरण २००२ (Maharashtra State Women Policy 2002) |

| कायदे / कानू / धोरणे |
|---|
| बालमजूरी (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६ (Child Labor (Prohibition & Regulation) Act 1986) |
| इतर अनुषांगिक बाबी |
| एच.आय.व्ही / एड्स प्रतिबंध धोरण (HIV / AIDS prevention related policies) |
| किमान मजूरी हक्क कायदा १९४८ - उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या अधिसूचना माहे जून २००० (Minimum Wagws Act 1948 - Notification from Directorate of Industries, Govt. of Maharashtra June 2000) |

**कृषि पणन विषयक धोरणे**

या व्यतिरिक्त, काही कृषि पणन विषयक धोरणांचा आढावा खालीलप्रमाणे थोडक्यात घेतलेला आहे.

अ) मॉडेल कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियम (मॉडेल ॲक्ट) - शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि सध्या अस्तित्वात असलेल्या बाजारपेठ व्यवस्थापन संरचनेमध्ये व्यावसायिकता आणण्याच्या दृष्टीने तसेच कृषि पणन व्यवस्थेचा स्पर्धात्मक विकास होण्यासाठी सदरहू कायदा अस्तित्वात आलेला आहे. या कायद्यानुसार खाजगी मार्केट यार्ड, थेट खरेदी केंद्रे, ग्राहक-शेतकरी बाजारपेठा आणि खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र यांची भागीदारी या सारख्या अभिनव व्यापारविषयक संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

ब) महाराष्ट्र कृषि उत्पन्न विपणन (नियमन) अधिनियम २००५ - महाराष्ट्र शासनाने सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र कृषि उत्पन्न विपणन (नियमन) अधिनियमामध्ये मॉडेल कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियम (मॉडेल ॲक्ट) या कायद्यावर आधारित सुधारणा केलेल्या आहेत. या कायद्यातील सुधारणांनुसार थेट खरेदी केंद्रे आणि खाजगी मार्केट यार्ड यांना विहित अटी-शर्तीवर अनुज्ञप्ति प्रदान करण्याची तरतूद आहे.

**जागतिक बँकेची सुरक्षाविषयक धोरणे**

जागतिक बँकेच्या वेगवेगळ्या सुरक्षाविषयक धोरणांचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पाच्या अनुषंगाने लागू होऊ शकणारी सुरक्षाविषयक धोरणे खालील विवरणपत्रात नमूद केल्यानुसार आहेत.

| कार्यकारी धोरण | शेरा (लागू आहे / लागू नाही) |
|---|---|
| पर्यावरण मूल्यमापन (बीपी / ओपी ४.०१) | **लागू आहे** |
| वनीकरण (ओपी ४.३६) | लागू नाही |
| वनस्पती रोग व्यवस्थापन (ओपी ४.०९) | **लागू आहे** |

| कार्यकारी धोरण | शेरा (लागू आहे / लागू नाही) |
|---|---|
| स्थानिक मूलवासी लोकसमुदाय (ओडी ४.२०) | **लागू आहे** |
| नैसर्गिक संपदा (ओपी ४.०४) | लागू नाही |
| अत्यावश्यक पुनर्वसन (ओपी ४.१२) | **लागू आहे** |
| भौगोलिक व सांस्कृतिक गुणधर्म (ओपीएन ११.०३) | लागू नाही |
| धरणांची सुरक्षा (ओपी / बीपी ४.३७) | लागू नाही |
| वादग्रस्त प्रभागातील प्रकल्प (ओपी / बीपी / जीपी ७.६०) | लागू नाही |
| आंतर्राष्ट्रीय जलमार्गावरील प्रकल्प (ओपी / बीपी / जीपी ७.५०) | लागू नाही |

## निष्कर्ष व अभिप्राय - सारांश

सदरहू महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्प यामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यक्रमांचे पर्यावरण विषयक आणि सामाजिक मुद्द्यांबाबत सर्वसाधारण मूल्यमापन सकारात्मक आहे. या प्रकल्पामध्ये पर्यावरण विषयक आणि सामाजिक घटकांवरील विपरित परिणामांची शक्यता नगण्य असून, त्याच बरोबर समाज व पर्यावरण यांच्या हिताच्या दृष्टीने पोषक असे परिणाम घडवून आणण्याच्या जास्तीत जास्त संधी या मध्ये उपलब्ध होत आहेत. या अभ्यासाच्या निष्कर्षांचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे.

पर्यावरण विषयक

१. या प्रकल्पामध्ये बहुतांश कार्यक्रम हे नव्याने सुरुवात करण्यात येत नसून, जे कार्यक्रम पूर्वीपासूनच सुरू आहेत त्यांच्या अंमलबजावणी पद्धतीमध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आलेली आहे. त्यामुळे जे काही परिणाम होतील त्यांची व्याप्ती मर्यादित राहील. असे विपरित परिणाम मर्यादित ठेवणे किंवा त्यांचा प्रभाव नाहिसा करणे यासंबंधाने करावयाच्या उपाययोजना अहवालामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत.

२. सोयी-सुविधा निर्मितीकरितां प्रस्तावित करण्यात आलेली ठिकाणे ही शेतमाल उत्पादन केंद्रांच्या समीप आहेत व पक्क्या रस्त्याने जोडलेली आहेत.

३. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जमीन ही कोणत्याही प्रकारे वन-जमीन अथवा संरक्षित प्रभागातील जमीन नाही. त्यामुळे सध्या बाजारपेठेतील अस्तित्वात असणाऱ्या सोयीसुविधांमध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणांमुळे जमीन वापरातील मोठे बदल किंवा नैसर्गिक संपदेला मोठ्या प्रमाणातील धोका या बाबी संभवत नाहीत.

४. बाजारपेठेत उपलब्ध असणाऱ्या सोयीसुविधांमध्ये सुधारणा घडून आल्यास शेतमालाच्या खरेदी विक्रीच्या प्रमाणात मोठी वाढ होण्याची जरी शक्यता असली तरी त्यानुषंगाने उद्‌भवू शकणाऱ्या घन कचरा / जैविक कचरा व्यवस्थापनामध्ये करावयाच्या आधुनिकीकरणासंबंधी अहवालामध्ये सूचना दिलेल्या आहेत.

५. शेतमाल विपणनाच्या उन्नत संधी उपलब्ध होण्यामुळे निश्चितपणे पीकांची दर एकरी उत्पादकता वाढीसाठी मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा तसेच कीटकनाशकांचा वापर वाढण्याची शक्यता आहे. यासाठी उपरोक्त प्रकल्पाकरितां विकसित केलेल्या कीटकनाशक व्यवस्थापनसंबंधित उपाययोजनांचा **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF) मध्ये वेगळा उल्लेख करण्यात आलेला आहे.

६. पर्यावरणास पोषक अशा पर्यायी साधनांचा वापर करून नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करणे साठी या प्रकल्पामध्ये संधी उपलब्ध होऊ शकतात.

सामाजिक

१. सदरहू प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे कोणत्याही प्रकारे लोकसमुदायाच्या विस्थापनासंबंधी व तद्‌नुषांगिक पुनर्वसनासंबंधी प्रश्न निर्माण होत नाहीत. या अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या प्रथम वर्षातील संस्था / ठिकाणे येथील उप-प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी जमीन ही सार्वजनिक वापराची आहे (स्थानिक स्वराज्य संस्थांकडे / सामाजिक संस्थांकडे / शासनाच्या विभागांकडे सदर जमिनींचे हक्क आहेत असे निदर्शनास येते). तथापि, या संबंधाने आकस्मिकरित्या कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास आवश्यकतेनुसार कराव्या लागणाऱ्या विस्थापनासंबंधी व तद्‌नुषांगिक पुनर्वसनासंबंधी करावयाची प्रस्तावित उपाययोजना अहवालामध्ये उध्दृत करण्यात आली आहे.

२. स्थानिक लोकसमुदायावर या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे कोणताही विपरित परिणाम होण्याची शक्यता नाही. तथापि प्रस्तावित **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF) मध्ये स्थानिक लोकसमुदाय (विशेषतः दुर्बल घटक) यांना प्रकल्पाचा लाभ उपलब्ध होण्यासंबंधाने उपाययोजना समाविष्ट केलेल्या आहेत.

३. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या योगे लाभार्थींच्या आरोग्य व शिक्षण यांच्या स्तरावर अप्रत्यक्षरित्या सकारात्मक परिणाम घडून येऊ शकतो.

४. प्रकल्पामुळे लाभार्थींना वाढत्या प्रमाणात शेतमाल बाजारपेठ व बाजारपेठ संबंधित सुविधा उपलब्ध होऊ शकतात असे अभ्यास गटाचे मत आहे.

तथापि, प्रकल्पामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या विपरित परिणामांचा प्रभाव कमी करणे आणि प्रकल्पाचे फायदे, मुख्यत्वे सामाजिक आणि पर्यावरण विषयक फायदे, जास्तीत जास्त प्रमाणात सर्व लाभार्थींपर्यंत पोहोचविणे या साठी अनेक महत्वांच्या मुद्द्यांबाबत योग्य विचार होणे गरजेचे आहे. जसे,

१. या प्रकल्पांतर्गत राबवावयाचे उप-प्रकल्प हे प्राधान्याने क्लिअर टायटल असलेल्या शासकीय जमीनीवर / सार्वजनिक जमीनीवर प्रस्थापित करणे उचित राहील, जेणेकरून कमीतकमी खाजगी जमीनीचे संपादन करावे लागेल.



(कृपया संदर्भासाठी मूळ इंग्रजी अहवाल पहावा.)

२. पर्यावरण संतुलनास पोषक असे बांधकाम आराखडे असणे अपेक्षित आहे.

३. घन कचरा व द्रवरूप कचऱ्याच्या व्यवस्थापनाची संयुक्तिक कार्यप्रणाली अंमलात आणणे आवश्यक राहील.

४. शेतकऱ्यांकरितां संयुक्त कीटकनाशक व्यवस्थापन, मृदा व सूक्ष्म अन्नद्रव्ये यांचे व्यवस्थापन आणि भू-जल व्यवस्थापन या पर्यावरण संतुलन अबाधित ठेवण्याच्या कार्यपद्धतीबाबतचे क्षमतावृद्धी आणि जाणीव जागृती कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

५. या प्रकल्पामध्ये शेतकऱ्यांच्या गटाची आवश्यक क्षमतावृद्धी होणे गरजेचे आहे.

६. सदरहू प्रकल्पामध्ये महिला, आदिवासी व इतर वंचित लोकसमुदाय आणि संभाव्य लाभार्थींचे लहान / नगण्य गट यांच्या सहभागाबाबत प्रकल्प अंमलबजावणी करीत असतांना विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या आराखड्यात विशेषकरून महिलांचा शेतमाल विपणन गरजांविषयी सहभाग या सबंधाने अग्रक्रमाने उपक्रमांचा समावेश करण्यात यावा.

**लाभार्थींशी सल्लामसलत**

या प्रकल्पाशी निगडित असणारे सर्व घटकांचे प्रतिनिधींचे मत विचारात घेण्याच्या दृष्टीने सदर अभ्यास प्रकल्पाच्या संभाव्य लाभार्थींच्या व्यापक गटाबरोबर सल्लामसलत करून तयार करण्यात आलेला आहे. अभ्यासगटाने २० निवडक प्रकल्प स्थळांना भेटी दिल्या आहेत.सुगठित प्रश्नावलीच्या माध्यमातून एकूण १५० लाभार्थींशी (यापैकी ४८ शेतकरी, ४६ मच्छिमार आणि ५६ पशुधन बाळगणारे शेतकरी आहेत) मुलाखतीद्वारे संपर्क साधण्यात आला आहे. महिला गट, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (अनुसूचित जाती, जमाती व आदिवासी सह) तसेच शेतकऱ्यांचे गट आणि सहकारी संस्था यांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली. बाजारपेठेतील सोयीसुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रकल्पामध्ये समाविष्ठ करावयाच्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रतिनिधींशी, संबंधित खात्यांच्या स्थानिक अधिकाऱ्यांबरोबर, शेतमाल व्यापार साखळी मधील महत्वाचे घटक जसेः लहान व्यापारी, स्थानिक कमिशन एजंट, हमाल-मापाडी यांच्या बरोबरही अभ्यासगटाच्या प्रतिनिधींनी चर्चा / सल्लामसलत केली (गोषवारा संलग्न प्रपत्र ब व क मध्ये जोडलेला आहे). सदरहू अभ्यासाचे निष्कर्ष आणि अभिप्राय **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** मसूदा तयार करण्यासाठी उपरोक्त महत्वाच्या प्रतिनिधी गटाचे मत विचारात घेण्यात आलेले आहे.

**पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF)

संपूर्ण प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व कार्यान्वयन या अनुषंगाने पर्यावरण आणि सामाजिक प्रश्नांसंबंधी आवश्यक दखल घेऊन **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF) विकसित करण्यात आलेली आहे. प्रकल्प अंमलबजावणीच्या सर्व टप्प्यांवर सदर ESMF कार्यपद्धती लागू करण्यात येईल. ESMF कार्यपद्धती प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील तीन प्रमुख टप्प्यांवर विकसित करण्यात आलेली आहे – प्रकल्प नियोजन, प्रकल्प अंमलबजावणी आणि प्रकल्प कार्यान्वयन. या प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर ज्या कारणांमुळे पर्यावरणावर विपरित परिणाम होऊ शकेल अशी कारणे पूर्वनिश्चित करून त्यांचे निराकारण करण्याची उपाययोजना ESMF कार्यपद्धतीमध्ये समाविष्ठ केलेली आहेत. त्याचबरोबर ESMF कार्यपद्धती मध्ये विस्थापन व पुनर्वसन, स्त्री-पुरूष समानता, आदिवासी विकास, कीटकनाशकांचा वापर,

क्षमताविकास आणि त्यासंबंधीच्या संस्थात्मक व्यवस्था याबाबतच्या महत्वाच्या मुद्द्यांबाबतही विचार करण्यात आलेला आहे. ESMF कार्यपद्धतीनुसार उपप्रकल्पांची छाननी व सनियंत्रण करणे सुकर होईल.

ESMF अहवालामध्ये विहित करण्यात आलेल्या निकषावर आधारित उपप्रकल्पांची छाननी करण्यात येईल व त्यानुसार या प्रकल्पामध्ये त्यांना समाविष्ठ करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. कोणताही प्रकल्प / प्रकल्पांतर्गत कार्यवाही ज्यामुळे विस्थापना होण्याची शक्यता निर्माण होईल अथवा ज्यामुळे पर्यावरण संतुलन राखणे शक्य होणार नाही, असे प्रकल्प या अर्थसहाय्यासाठी अपात्र ठरतील. ESMF अहवालामध्ये योजनानिहाय छाननी प्रक्रिया सुचविण्यात आलेली आहे.

## विहित करण्यात येत असलेल्या घटकनिहाय कार्यपद्धती

### विस्थापना व पुनर्वसन संदर्भात जमीन मालकीहक्क संबंधाने कार्यपद्धती

प्रकल्पामध्ये अंमलबजावणीसाठी पहिल्या वर्षाकरितां निवडण्यात आलेल्या ठिकाणी (Project Sites) उपप्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही जमीनीचे नव्याने संपादन करण्यात येणार नाही तसेच स्थानिक लोकसमुदायांचे कोणत्याही प्रकारचे भौगोलिक किंवा आर्थिक स्तरीय बदल संभवत नाहीत. तथापि, प्रकल्पासाठी भविष्यामध्ये भू-संपादन करण्याचे व त्यानुषंगाने विस्थापना-पुनर्वसन संबंधित कामकाज करावी लागण्याची शक्यता गृहित धरून **पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती** (Environmental & Social Management Framework - ESMF) विकसित करण्यात आलेली आहे. या कार्यपद्धतीमध्ये सर्वप्रकारच्या बाधित व्यक्तींच्या सर्वप्रकारच्या मालकीच्या जमीनीच्या आणि इतर सर्वप्रकारच्या मालमत्तेच्या मालकीहक्काचा विचार करण्यात आलेला आहे. बाधित व्यक्तिंच्या जमीनीच्या व इतर मालमत्तेच्या मोबदल्याव्यतिरिक्त त्यांना नवीन ठिकाणी सुस्थापित होण्यासाठी (त्यांची भौगोलिक विस्थापना झाल्यास) आणि / किंवा नवीन रोजगार मिळवून देण्यासाठी (त्यांना उपजीविकेसंबंधाने वंचित व्हावे लागल्यास) सुद्धा सहाय्य देण्यात येईल.

प्रत्येक उपप्रकल्पाच्या पूर्वतयारी टप्प्यावरच, त्याच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या संभाव्य विपरित परिणामांच्या निकषांच्या आधारे छाननी करण्यात येईल. ज्या उपप्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये लोकसमुदायाचे विस्थापना व पुनर्वसन करणे अपरिहार्य असल्याचे निश्चित करण्यात येईल, त्याबाबत त्या विशिष्ठ प्रकल्पाच्या नियोजन स्तरावरच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत योजना आखण्यात येईल. अशा पुनर्वसन योजनेची प्रमुख तत्वे खालीलप्रमाणे राहतील.

१. स्थानिक लोकसमुदायाची कोणत्याही प्रकारची भौगोलिक विस्थापना (निवासी अथवा व्यवसायाच्या जागेपासून) होण्याची शक्यता असल्यास असे उपप्रकल्प घेण्यात येऊ नयेत.

२. प्रस्तावित प्रकल्पासाठी कोणत्याही खाजगी जमीनीचे संपादन करणे अपेक्षित नाही, तथापि, अपरिहार्य कारणाने करावे लागल्यास योग्य तो मोबदला देण्यात यावा.

३. प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या जमीनीवरील खाजगी जमीन मालक तसेच अनधिकृत रहिवासी (Encroachers) यांना स्वेच्छेने सदर जमीनीवरील हक्क सोडण्यासाठी प्रवृत्त करण्यात यावे. मात्र यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करण्यात येणार नाही.

४. निवडलेली जमीन जर पंचायत अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीची असल्यास प्रस्तावासोबत त्या संस्थेचा ठराव असणे आवश्यक आहे. अशा जमीनीच्या मालकीहक्कासंबंधी काही संदिग्धता नसल्याची खातरजमा करणेही आवश्यक आहे.

५. प्रकल्प बाधित कुटुंबांना, त्यांच्या मालकीहक्कास बाधा न येता, नुकसान भरपाई व सहाय्य देण्यात यावे.

*प्रकल्प बाधित कुटुंबांना सहाय्य* :- प्रकल्प अंमलबजावणीमुळे कोणत्याही जमीनीचे संपादन करणे अथवा त्याचा विपरित प्रभाव होणे निश्चितच अपेक्षित नाही. तथापि, भू-संपादन अपरिहार्य असल्यास बाधित कुटुंबांना नुकसान भरपाई प्रदान करण्यासंबंधी उपाययोजना निश्चित करण्यासाठी **विस्थापना व पुनर्वसन संदर्भात जमीन मालकीहक्क संबंधाने कार्यपद्धती** तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये **महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम २००१** मधील तरतूदी, प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसनसंबंधी राष्ट्रीय धोरण २००३ मधील तरतूदी आणि त्याचबरोबर राज्यातील इतर क्षेत्रामध्ये पुनर्वसन बाबत आलेले अनुभव या बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत.

*विस्थापना व पुनर्वसन संदर्भात जमीन मालकीहक्क संबंधाने कार्यपद्धती* :- या प्रकल्पासाठी जमीनीच्या अथवा इतर मालमत्तेच्या संपादनामुळे त्यांच्या मालकीहक्कापासून वंचित राहण्याने होऊ शकणारे नुकसानापोटी भरपाई देण्याची तरतूद यामध्ये करण्यात आलेली आहे. प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन पूर्ण होण्यासाठी आर्थिक भरपाई व सहाय्य यांच्या व्यतिरिक्त अशा कुटुंबांना त्यांच्या किमान पूर्वीच्या दर्जाचे उपजीविकेचे साधन प्राप्त होण्यासाठी सहाय्य देण्यात येईल. त्यांना आवश्यकतेनुसार योग्य त्या उत्पादनाच्या साधनांसाठी अनुदान, उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध करून घेण्यासाठी आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून किमान कौशल्यवृद्धी उपलब्ध करून घेण्यासाठी यासाठी समुचित सहाय्य देण्यात येईल. या शिवाय प्रकल्पबाधित कुटुंबांच्या सदस्यांना प्रकल्पांतर्गत रोजगार देण्याबाबत प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**स्त्री-पुरूष समानता विकास व अनुषांगिक उपाययोजना**

प्रस्तावित प्रकल्पाशी निगडित असणाऱ्या लिंगभेद निर्मूलन संबंधित बाबींचे पैलू कार्यक्षेत्रातील महिला गट व लाभार्थी यांच्याशी करण्यात आलेल्या सल्लामसलतीमधून स्पष्ट झालेले आहेत. त्यातून महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी आणि या प्रकल्पाचे लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी उपाययोजना आखण्यात आलेल्या आहेत. सदर चर्चा व सल्लामसलतींमधून असे स्पष्ट होत आहे की,

१. कोणत्याही विकास कार्यक्रमांमध्ये महिलांचा अत्यल्प / नगण्य सहभाग दिसून येतो.

२. शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये महिलांचा महत्वपूर्ण योगदान व सहभाग आहे, तथापि समाजामध्ये त्याची कदर नाही.

३. जमीन मालकी सर्वसाधारणपणे पुरुषांकडे आहे.

४. परंपरागत असलेल्या सामाजिक / आर्थिक बंधनामुळे महिला शेतकरी शेतमाल बाजारपेठेपर्यंत सहजासहजी पोहोचू शकत नाहीत.

५. एकाच प्रकारचे काम करण्यासाठी महिलांना सामान्यतः पुरुषंपेक्षा कमी मजूरी देण्यात येते. क्वचित प्रसंगी ती देण्याचेही टाळले जाते.

या प्रकल्पामुळे महिलांशी संबंधित सर्व प्रश्न सुटतील असे म्हणता येणार नाही, तथापि प्रकल्प अंमलबजावणीमध्ये आणि प्रकल्पाच्या अंतिम लाभामध्ये महिलांशी निगडित असणाऱ्या विविक्षित बाबींविषयी योग्य भूमिका घेऊन कार्यवाही करणे अपेक्षित आहे. म्हणून शासनाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या महिलाविषयक सामाजिक-आर्थिक विकास कार्यक्रमांना आधारभूत ठेऊन या प्रकल्पामधील घटकांची अंमलबजावणी महिलागट-केंद्रित करणे शक्य आहे. या प्रकल्पांतर्गत शेतमाल बाजारपेठेमध्ये येणार असलेल्या महिलांसाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधा (जसे, महिलांसाठी खास विश्रामगृहे, स्वच्छतागृहे, इ.) निर्माण करून शेतमालाच्या व्यापारामध्ये त्यांचा सहभाग वाढण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. या दृष्टीने प्रकल्पामध्ये महिलांच्या आवश्यकतेनुरूप विशिष्ठ कार्यक्रम पुढीलप्रमाणे समाविष्ठ करण्यात येतील - बाजारपेठेत येणाऱ्या महिला सदस्यांच्या मूलभूत सोयी-सुविधांच्या गरजा नेमक्या कोणत्या आहेत याची निश्चिती करणे, महिला स्वयंसहायता गटांचे सहकार्याने प्रकल्पाच्या कार्यक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, बाजार समित्यांमधील सदस्य महिलांचा प्रकल्पामध्ये सक्रीय सहभाग वाढण्यासाठी प्रशिक्षण आयोजित करणे, बाजार समित्यांच्या व उत्पादक संस्थांच्या सर्व सभांमध्ये महिला सदस्यांची जास्तीतजास्त उपस्थिती राहील यासाठी दक्षता घेणे, इ.

## आदिवासी विकास उपाययोजना

या प्रकल्पातील काही उपप्रकल्प हे प्रामुख्याने आदिवासी क्षेत्रामध्ये प्रस्तावित करण्यात येत आहेत. या क्षेत्रांना समक्ष भेट देऊन पाहणी केली असतां व आदिवासींबरोबर झालेल्या संवादातून असे निदर्शनास आले की, शेतमाल बाजारपेठेच्या आवश्यक त्या सुविधांपासून आदिवासी वंचित आहेत. तसेच, शासनाच्या बहुतेक विकास कार्यक्रमांमध्ये आदिवासींचा सहभाग नगण्य असतो. एका बाजूस सांस्कृतिक तफावत तर दुसऱ्या बाजूस प्राधान्याने आदिवासींना विकास प्रक्रियेच्या मुख्य प्रवाहामध्ये समाविष्ठ करण्यासाठीचे अपुरे प्रयत्न अशी या बाबतची कारणमिमांसा सांगता येईल. सदरहू प्रकल्पाची अंमलबजावणीच्या अनुषंगाने आदिवासींच्या जिव्हाळ्याच्या बाबी / विषय पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.

१. आदिवासी जनसमुदाय आजमितीसही परंपरागत पद्धतीनेच शेतीची कामे पार पाडतो. या कारणाने शेतीच्या सुधारित पद्धतींची व आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख त्यांना होऊ शकलेली नाही.

२. बाजारपेठेमधील नवीन संधींबाबत त्यांना अत्यल्प माहिती आहे आणि बहुतांशी ते या बाबत अनभिज्ञ आहेत.

३. संस्थात्मक पतपुरवठ्याच्या सोयी, कृषि निविष्ठा (Farm Inputs) व कृषि विस्तार सेवा या पुरेशा प्रमाणात त्यांना उपलब्ध होऊ शकलेल्या नाहीत.

४. आदिवासींचे कमकुवत नेतृत्व आणि त्या कारणानेच विकास कार्यक्रमासंबंधीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांचे नगण्य प्रतिनिधित्व असणे अथवा त्यामध्ये त्यांचा सहभाग नसणे या बाबीही महत्वाच्या आहेत.

या प्रकल्पामध्ये आदिवासींच्या विकासासंबंधीची उपाययोजनेचा प्रमुख उद्देश आदिवासींचा सहभाग वाढविणे आणि त्यायोगे आदिवासींना अन्य सर्वसामान्य लाभार्थीप्रमाणेच प्रकल्पाचे जास्तीतजास्त लाभ उपलब्ध करून देणे हा आहे. यामध्ये आदिवासी जनसमुदायाबरोबर संवाद साधून या प्रकल्पाचे फायदे व त्यातून निर्माण होणाऱ्या संधी याबाबत त्यांना अवगत करणे, बाजार समित्यांच्या कामकाजामध्ये आणि संस्थेच्या निर्णय-प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे, तसेच कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे, इ. उपाययोजना करण्यात येतील. अहवालामध्ये सुचविण्यात

आलेल्या विशेष प्रोत्साहन योजना जसे, (शासनाच्या प्रचलित असलेल्या आदिवासी विकास योजनेशी संलग्न असणारी) सुविधा वापरासाठीचे शुल्क माफी योजना, प्रकल्पांतर्गत तयार होणाऱ्या गोडाऊन सुविधेच्या वापरासाठी त्यांच्या मागणीस प्राधान्यक्रम देणे, इ. योजनांमुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणी व कार्यान्वयन यामध्ये आदिवासी जनसमुदायाचा सहभाग वाढेल.

**मृदा / सूक्ष्म-अन्नद्रव्ये / उपद्रवी किडींचा नाश व्यवस्थापन यासंबंधाने संयुक्त उपाययोजना**

या प्रकल्पामध्ये मार्गदर्शक प्रयोग (Demonstrations) करण्यासाठी काही शेतीसाठीच्या रसायनांचा (रासायनिक खते व उपद्रवी कीड नाशक) वापर मर्यादित प्रमाणात करावा लागेल. तथापि, अशाप्रकारचे यशस्वी प्रयोग आणि बाजारपेठेतील वाढत्या संधी यामुळे प्रकल्प अंमलबजावणी क्षेत्रामध्ये उपरोक्त शेती-रसायनांचा वापर वाढण्याची शक्यता आहे. शेती-रसायनांच्या अशा वाढत्या वापरामुळे होणारे संभाव्य दुष्परिणाम रोखण्यासाठी अहवालामध्ये मृदा / सूक्ष्म-अन्नद्रव्ये / उपद्रवी किडींचा नाश व्यवस्थापन यासंबंधाने संयुक्त उपाययोजना विहित करण्यात आलेली आहे. या उपाययोजनेचा गाभा म्हणजे प्रकल्पामुळे होऊ शकणारे पर्यावरणाचे प्रदूषण टाळणेसाठी आणि किमान खर्चामध्ये उपद्रवी किडींचा नाश करण्यासाठी कमीतकमी शेती विषयक निविष्ठांचा (Agricultural Inputs) वापर करणे हा आहे. यामध्ये पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित उपद्रवी किडींचा नाश व्यवस्थापन यासंबंधाने उपाययोजनेचाही समावेश केलेला आहे. विशेषतः प्रकल्पाच्या लाभार्थ्यांना वार्षिक नियोजन करून यासंबंधाने जाणीव जागृती कार्यक्रम राबविणे, लाभार्थांना प्रशिक्षण देणे, मार्गदर्शक प्रकल्प राबविणे, त्यांची क्षमतावृद्धी करणे, इ. कार्यक्रम हाती घेण्यात येतील.

**संस्थात्मक व्यवस्था**

या सर्व उपाययोजना आणि पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती (Environmental & Social Management Framework - ESMF) राबविण्यासाठी म. रा. कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Coordination Unit – PCU) यांनी यथोचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. याकरितां संस्थात्मक कार्यप्रणाली अस्तित्वात असणे आणि सदरहू प्रकल्पाच्या सर्व उप-घटकांची व त्या अंतर्गत येणाऱ्या उप-प्रकल्पांची अंमलबजावणी उपरोक्त विहित कार्यपद्धतीनुसार (ESMF नुसार) करण्याची निश्चित जबाबदारी त्यांच्याकडे देणे आवश्यक आहे.

या प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Coordination Unit – PCU) च्या अखत्यारीत वेगळा **पर्यावरण व सामाजिक विषयक कक्ष** (Environment & Social Cell – ESC) नेमण्यात यावा असे IESA अभ्यासगटाचे निष्कर्ष आहेत. या विशेष कक्षामध्ये एक सामाजिक विषयतज्ञ (Social Expert) आणि एक पर्यावरण विशेषज्ञ (Environmental Specialist) राहतील आणि ते संबंधित प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit – PIU) बरोबर संपर्कात राहून या विषयी आवश्यक ते सनियंत्रण करतील. प्रत्येक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Project Implementation Unit – PIU) मध्ये एक जन-समुदाय विस्तार कार्यकर्ता (Community Extension Worker) राहील आणि त्याच्याकडे उप-प्रकल्प स्तरावरील जन-जागृती व पर्यावरण-सामाजिक प्रश्नांची सोडवणूक या विषयीची महत्वाची जबाबदारी राहील. या प्रकल्पामध्ये ज्या ठिकाणी बिगर-शासकीय संस्थांचा सहभाग आहे तेथे जन-जागृतीची जबाबदारी पार पाडण्यासाठी, विशेषतः प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये सक्रीय सहभाग घेण्यासंबंधात आदिवासी जनसमुदाय तसेच महिला गट या दुर्बल घटकांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी, त्यांचे सहकार्य घेण्यात येईल.

### प्रशिक्षण व क्षमतावृद्धी

सक्षम व कुशल मनुष्यबळ हे कोणत्याही प्रकल्पाच्या यशस्वितेचे गमक आहे. म्हणून या प्रकल्पाशी निगडित असणारे कर्मचारी आणि इतर सर्व कार्यकर्ते यांना प्रकल्पाच्या अंमलबजावणी संबंधी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देणे व त्यांची क्षमतावृद्धी करणे महत्वाचे आहे. IESA अहवालामध्ये प्रकल्पाच्या विविध लाभार्थींना (जसे, प्राथमिक स्तरावरील सहभागी सदस्य, प्रकल्पाचे अंतर्गत स्थापन होणाऱ्या सामाजिक संस्था आणि प्रकल्प कार्यकर्ते, इ. यांना) तसेच प्रकल्पाशी निगडित असणारे कर्मचारी आणि इतर सर्व कार्यकर्ते यांना प्रशिक्षण देण्यासंबंधी विस्तृत प्रशिक्षण व क्षमतावृद्धी आराखडा विहित करण्यात आलेला आहे. IESA अहवालामध्ये या प्रशिक्षण व क्षमतावृद्धी कार्यासाठी योग्य असणाऱ्या, राज्यामधील तसेच राज्याबाहेरील, निवडक प्रशिक्षण संस्थांची यादी देण्यात आलेली आहे.

### विवाद समाशोधन यंत्रणा (Conflict Resolution Mechanism)

प्रकल्प अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये, विशेषतः उत्पादकांच्या संस्था स्थापन करतांना, समान हक्क, सर्वसमावेशकता, सहभाग आणि पारदर्शकता या बाबीं संदर्भात अनेक विवाद निर्माण होण्याची शक्यता असल्याने निश्चित अधिकार असलेली व सक्षम अशी **विवाद समाशोधन यंत्रणा (Conflict Resolution Mechanism)** आवश्यक आहे. लोक-समूह स्तरावरील विवाद-निराकारण-यंत्रणा सक्षम आहेत असे दिसून येते. यासाठी प्रत्येक गटामध्ये कार्यकारी समिती सारखे संस्थात्मक तसेच सर्वसाधारण सभा या सारखे औपचारिक व्यासपीठ उपलब्ध आहेत. प्रस्तावित उत्पादकांच्या संस्था आपल्या अंतर्गत विवादांची सोडवणूक करण्यासाठी संस्था-समूह पातळीवरील विवाद समाशोधन यंत्रणा (Conflict Resolution Mechanism) स्थापन करतील. त्याचे कामकाज कंपनी अधिनियमानुसार चालेल व त्याप्रमाणे विहित केलेल्या नियम-कार्यपद्धतीनुसार संस्थेच्या भागधारकांच्या अंतर्गत उपस्थित होऊ शकणारे विवादांचे निराकारण करण्यात येते. या प्रकल्पाच्या अनुषंगाने उद्भवू शकणारे विवादांचे समाशोधन व निराकारण परिणामकारकरित्या करण्यासाठी कार्यपद्धती, त्यासाठी विहित केलेली कालमर्यादा, या बाबत निश्चित केलेल्या विविध स्तरावरील जबाबदाऱ्या, इ. बाबी विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

| विवाद निराकारण स्तर | प्रक्रिया | कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|
| **स्तर क्र. १** | | | |
| उत्पादक स्तर | १. विवादांचे निराकारण उत्पादकांच्या संस्थेच्या कार्यकारी समिती व सर्वसाधारण सभा मार्फत केले जाईल.<br>२. प्रभाग अथवा विभाग स्तरावरील विवाद निराकारण करण्यासाठी संस्था समूह पातळीवर विवाद निराकारण समिती स्थापन करणे. या समिती मध्ये उत्पादक संस्थांच्या | विवाद / तक्रार उपस्थित झाल्या पासून १५ कामकाजाच्या दिवसांच्या आत. | उत्पादकांच्या संस्थेचे अध्यक्ष / सचिव |



(कृपया संदर्भासाठी मूळ इंग्रजी अहवाल पहावा.)

| विवाद निराकरण स्तर | प्रक्रिया | कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|
| | कार्यकारी समित्यांचे प्रतिनिधींचा समावेश राहील.<br>३. अपवादात्मक परिस्थितीमध्ये खात्यांच्या योग्य त्या अधिकाऱ्यास समन्वयासाठी आमंत्रित करणे उचित राहील. | | |
| **स्तर क्र. २** | | | |
| उप प्रकल्प स्तर | १. उत्पादकांच्या संस्थेचे प्रतिनिधी, शासनाच्या संबंधित खात्यांचे अधिकारी व बाजार समितीचे अधिकारी यांचा समावेश असणारी विवाद निराकरण समिती स्थापन करणे.<br>२. या समितीमध्ये महिला व दुर्बल घटक यांच्या प्रतिनिधींचा समावेश यथोचित रित्या करण्याची खातरजमा करावी.<br>३. म. रा. कृषि पणन मंडळ चे सदस्य हे या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>४. या समितीचे जास्तीत जास्त ७ (सात) सदस्य असावेत. | विवाद / तक्रार उपस्थित झाल्या पासून ३० कामकाजाच्या दिवसांच्या आत. | कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे / मार्केट कमिट्यांचे पदाधिकारी |
| **स्तर क्र. ३** | | | |
| म. रा. कृषि पणन मंडळ | १. उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी, मार्केट कमिट्यांचे पदाधिकारी सदस्य, संबंधित खात्यांचे प्रतिनिधी सदस्य आणि पर्यावरण व सामाजिक कार्यवाही कक्षाचा सदस्य यांचा समावेश असणारी विवाद निराकरण समिती स्थापन करणे. | विवाद / तक्रार उपस्थित झाल्या पासून १५ कामकाजाच्या दिवसांच्या आत. | म. रा. कृषि पणन मंडळ / पर्यावरण व सामाजिक कार्यवाही कक्ष |

| विवाद निराकरण स्तर | प्रक्रिया | कालमर्यादा | जबाबदारी |
|---|---|---|---|
| | २. म. रा. कृषि पणन मंडळ चे वरिष्ठ अधिकारी हे या समितीचे अध्यक्ष राहतील.<br>३. या समितीचे जास्तीत जास्त ७ (सात) सदस्य असावेत. | | |

## सनियंत्रण व मूल्यमापन

सदरहू प्रकल्पाचे अंतर्गत व बाह्य असे दोनही प्रकारे सनियंत्रण करण्यात येईल. यामध्ये पर्यावरण विषयक व सामाजिक व्यवस्थापन कार्यपद्धती (Environmental & Social Management Framework - ESMF) याबाबत सनियंत्रणाचाही समावेश राहणार आहे. या शिवाय, प्रकल्पाच्या प्रगतीचा सर्वांगीण आढावा घेण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार तात्काळ त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने ESMF बाबत त्रयस्थ स्वतंत्र यंत्रणेकडून प्रकल्प-मध्यावधीचे मूल्यमापन (a mid-term evaluation of ESMF Activities by a third party) करण्यात येईल. या प्रकल्पाची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होण्यासाठी सनियंत्रण व मूल्यमापन आढाव्यातून निष्पन्न होणारे निष्कर्ष व त्या अनुषंगाने केलेली / करावयाची कार्यवाही **महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्पाच्या** अंमलबजावणी प्रक्रियेचा सुसंगत भाग असणे आवश्यक आहे.

-०-०-०-

# *महाराष्ट्र कृषि स्पर्धात्मक विकास प्रकल्प*

# *पर्यावरण व सामाजिक मूल्यांकनाबाबत*

# *संयुक्त अहवाल*

# *(सारांश)*



(कृपया संदर्भासाठी मूळ इंग्रजी अहवाल पहावा.)